॥ श्री स्वामी समर्थ तारक मंत्र ॥

निःशंक हो निर्भय हो मना रे
प्रचंड स्वामी बळ पाठीशी रे
अतर्क्य अवधूत हे स्मरणगामी
अशक्यही शक्य करतील स्वामी ॥१॥

जिथे स्वामी पाय तिथे न्यून काय।
स्वये भक्त प्रारब्ध घडवी ही माय।
आज्ञेविना काळ ना नेई त्याला।
परलोकी ही ना भीती तयाला ॥२॥

उगाचि भितोसी भय हे पळू दे।
जवळी उभी स्वामी शक्ती कळू दे।
जगी जन्ममृत्यु असे खेळ ज्यांचा।
नको घाबरू तू असे बाळ त्यांचा ॥३॥

खरा होई जागा श्रद्धेसहित।
कसा होशी त्याविणा तू स्वामीभक्त।
कितीदा दिला बोल त्यांनीच हात।
नको डगमगू स्वामी देतील साथ ॥४॥

विभूती नमन नामध्यानादि तीर्थ।
स्वामीच या पंचप्राणामृतात।
हे तीर्थ घे आठवी रे प्रचिती।
न सोडी कदा स्वामी ज्या घेई हाती ॥५॥

© www.madhaveeraghuveer.com